

# लिंग समभाव आणि महिला सक्षमीकरण


**मुख्य संपादक**

प्राचार्य डॉ. अशोक खैरनार

**संपादक**

प्रा. कांतीलाल सोनवणे

प्रा. अतिष मेश्राम

डॉ. प्रियंका सुलाखे





अथर्व

- साहित्यातील समाजसुधारकांचा स्त्री विषयक विचार.......... ७९
  – प्रा.डॉ. संजय राजधर महाले
- स्वयंसहाय्यता बचतगट आणि महिला सक्षमीकरण........... ८४
  – डॉ. संभाजी पाटील
- महिला सबलीकरण आणि स्त्री जीवन ...................... ९०
  – प्रा. नाईक पी.एन.
- राष्ट्रीय विकास आणि महिला सक्षमीकरण ................... ९२
  – प्रा. सुरेश रमण देसले
- भारतातील आर्थिक नियोजन आणि स्त्री सक्षमीकरण ........ ९७
  – प्रा. श्रीमती नेरे अरुणा विजयकुमार
- जात, लिंगभाव आणि हिंसाचार ........................ १०२
  – प्रा. गजेंद्र सोमा जगदेव
- श्रीमती इंदिरा गांधी ...................................... १०७
  : भारताच्या प्रभावशाली महिला पंतप्रधान
  – प्रा. शरद बाबुराव सोनवणे
- महिला सबलीकरण आणि सामाजिक स्थित्यंतरण .......... ११३
  – प्रा. दत्तात्रय प्रभूराव मुंढे
- गीता साने यांच्या 'हिरवळीखाली'.......................... ११६
  या कादंबरीमधील स्त्री चित्रण
  – प्रा. मिलिंदकुमार भिकाजी देवरे
- निवडक दलित कथेतील स्त्री दर्शन............................ १२१
  – प्रा. अरुण डी. मोरे
- 'कुलवधु'चे कथानक व सामाजिक स्थिती ................. १२५
  – प्रा. निलेश एकनाथ पाटील
- महिलांचे घटनात्मक व कायदेशीर अधिकार ................ १३३
  – प्रा.डॉ. राजू परभत निकम
- महिला सक्षमीकरण आणि महिलांचा राजकीय सहभाग ..... १४०
  – प्रा. रमेश एकनाथ भारुडकर
  – प्रा. गजानन भिकाजी फुलसावंगे

## महिला सबलीकरण आणि स्त्री जीवन

– प्रा. नाईक पी.एन.
कला व वाणिज्य महाविद्यालय, अक्कलकुवा, जि. नंदुरबार

''स्वातंत्र्य प्राप्ती नंतर भारत भारत स्त्रियांच्या सशक्तीकरण साठी प्रयत्न करित आहे. १९२० नंतर हे प्रयत्न चालु आहे. शासन आणि शासनेत्तर क्षेत्र असा दोन्ही क्षेत्राव्दारे स्त्रिशिक्षणाला महत्व दिले आहे. त्यांना उत्तम आरोग्य मिळवं, उपजीविकेचे साधन मिळाव, घरगुती व सामाजिक निर्णय प्रक्रियेत सहभाग घेता यावा यासाठी संधी देत आहेत. परिपुर्ण जीवन जगता यावे. १९९३ मध्ये झालेली घटना दुरुस्ती या दृष्टिने मोठे पाऊल म्हणता येईल. या दुरुस्तीमुळे अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातीतील जनतेला ग्रामपंचायत क्षेत्रातील लोकसंख्ये नुसार ग्रामपंचायतीमध्ये जागांना आरक्षण मिळु लागले. महिलांसाठी एक तृतीयांश राखीव जागा ही फलदायी ठरल्या त्यामुळे महिलांना राजीकय क्षेत्रात व सामातिजक क्षेत्रात सक्षम झाल्या. म्हणुन अर्थसंकल्पाने महिलांना सबळ बनविण्यासाइी विविध योजनांची निर्मिती केली आहे. अर्थसंकल्प महिला प्रधान असल्याने महिला लाभधारकांना विशेष फायदा मिळाला. शासनाच्या पुढाकाराने दोन समस्या सोडवेल असा मानस आहे. पहिली समस्या म्हणजे स्त्रियांचे आरोग्य, व ग्रामीण भागात राहणाऱ्या स्त्रियांचे इंधन (सरपण) स्वयंपाक बनविण्यासाठी लागणाऱ्या पारंपारिक सवयीपासुन मुक्ती मिळेल. आणि दुसरे असे की, प्रदुषणाचे प्रमाण ही कमी होईल. या उपाययोजनेने महिला सबलीकरण होईल व त्यांचे आरोग्य ही जपले जाईल.''[१]

''बेटी बचाव, बेटी पढाव या कार्यक्रमासाठी शासनाने २८० कोटी मंजुर केले आहे. हा कार्यक्रम त्यांच्या नावा प्रमाणे जनतेमध्ये जागरुकता निर्माण व्हावी व मुलींसाठी मांडलेली कल्याणकारी सेवांची स्थिती सुधारावी या दृष्टीने शासन प्रयत्न करित आहे. त्याच बरोबर भारत सरकारने महिला आणि बालकल्याण मंत्रालयाने. एच. आर. विभाग आणि आरोग्य कुटूंबकल्याण यांच्या संयुक्त विद्यमाने बेटी बचाओ, बेटी बढाओ हा कार्यक्रम उभारला आहे. त्याच बरोबर सुकन्या समृद्ध योजना ही एक प्रकारची अशी उपाययोजना आहे. अल्परक्कमेने मुलींच्या नावाने खाते उघडता येते आणि भारत सरकारच्या बेटी बचाओ, बेटी पढाओ योजनेचा भाग आहे. मुलीचे शिक्षण आणि लग्नासाठी येणारा खर्च भागवता यावा यासाठी सुकन्या समृद्धी योजना सुरु करण्यात आलेली आहे. व

जनतेला जागे करण्यासाठी स्त्रियांना स्वत:च जागृत होण्याची गरज आहे. एकदा स्त्रिची प्रगती झाली की, कुटूंब, गांव आणि देशाची प्रगती होण्यास वेळ लागत नाही. म्हणूच पंतप्रधानांनी स्त्रि सबलीकरणाचे कार्यक्रम सुरु केले आहे. स्त्रिशिक्षणाव्दारे मुलींना सबळ करण्यामध्ये हे महत्त्वाचे पाऊल आहे.''२

''१९ व्या शेतकातील स्त्रियांचे आर्थिक जीवन पाहत असतांना स्त्रियांचे आर्थिक अधिकार व त्यांचे आर्थिक क्षेत्रातील कार्य या दोन घटकांचा विचार करावे लागते. भारतीय संस्कृतीत स्त्रियांना कुटूंब व समाजात दुय्यम स्थान होते. या काळातील स्त्रिया आर्थिक दृष्ट्या स्वयंपुर्ण स्तरावर स्त्रियांच्या समस्यांकडे लक्ष वेधण्यात आले. स्त्रीवाद या नावाने एक नवीन विचार प्रवाह आणि चळवळ पुढे आली. पश्चिमात्य देशात सुरु झालेली ही वैचारिक लाट भारतासारख्या देशातही आली. स्त्रीला देवीसमान मानणाऱ्या भारतीय संस्कृतीत स्त्रियांचे परंपरागत समाजातील स्थान अशा स्वरुपाचे होते. त्या कोणते बदल झाले, स्त्रिच्या समस्या कोणत्या या गोष्टीकडे अभ्यासकाचे व समाजि कार्यकर्त्योचे लक्ष गेले. स्त्रिला कायदयाने समानता मिळाली पण तिच्या दर्जात सुधारणा झालेली दिसुन येते. म्हणुनच नंतर वीस कलमी कार्यक्रमात स्त्रियांना समानता देण्यात आले. स्त्रिला शिक्षणाची संधी नव्हे तर १२ वी पर्यंतचे शिक्षण माफ करणे, स्त्रियांच्या हक्काबद्दल जागरुकता निर्माण करणे, सामाजिक, आर्थिक विकासाच्या राष्ट्र उभारणीच्या कामात स्त्रियांना समान संधी देणे, पुढे स्त्रियांना राखीव जागा देण्यात आले व सरकारने नवे महिला विषयक धोरणामध्ये संपतीचा अधिकार इ. प्रकारच्या समान संधी स्त्रियांना उपलब्ध करुन दिलेल्या आहेत.''३

''स्वातंत्र्यानंतर भारतीय समाजात स्त्रियांना समान दर्जा देण्याचा संदर्भात कायदयाच्या दृष्टीने विशेष प्रयत्न झालेत. भारतीय राज्यघटनेने स्त्री-पुरुष यांच्या मध्ये कोणताच फरक न करता दोघांनाही समान अधिकार प्रदान केलेत. त्यामुळे स्त्रिया या पुरुषांपेक्षा कनिष्ठ नाहीत. त्या देखील पुरुषाप्रमाणेच कोणत्याही भुमिका योग्य प्रकारे पार पाडु शकतात. फक्तृ त्यांना संधी मिळाली पाहिजे. स्वातंत्र्य, समता, बंधुता, आणि न्याय या मानवी मुल्यांचा विचार आहे. शिक्षण आणि नोकरी यामुळे स्त्रियांच्या कौटुंबिक भुमिकामध्ये परिवर्तन आलेले आहे. त्यामुळे स्त्रियांच्या परंपरागत भुमिकेत बदल झालेला आढळतो.''४

**संदर्भसूची**


१. योजना, मार्च २०१८ व फेब्रुवारी २०१८.
२. 'भारतीय स्त्रि जळवळचा इतिहास', डॉ. अनिल कढारे.
३. 'भारतीय स्त्री आणि मानवाधिकार', डॉ. स्मीता मेहेत्रे.
४. 'भारतीय समाज प्रश्न आणि समस्या', डॉ. प्रदीप आगलावे.

Impact Factor – 6.261 Special Issue - 146 B Feb. 2019 ISSN – 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

UGC Approved Journal

Multidisciplinary International E-research Journal

## RECENT TRENDS IN SOCIAL SCIENCES

Organized by

N. T. V. S's

**G. T. Patil Arts, Commerce and Science College,**

NANDURBAR, Dist. Nandurbar - 425 412 (Maharashtra)




■ GUEST EDITOR ■

**Dr. Madhulika Sonawane**

■ EXECUTIVE EDITOR ■

**Prof. Dr. Narendra B. Gosavi**

■ CHIEF EDITOR ■

**Dr. Dhanraj T. Dhangar**

RESEARCH JOURNEY

MULTIDISCIPLINARY ONLINE RESEARCH JOURNAL

**This Journal is indexed in :**

- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmoc Impact Factor (CIF)
- Global Impact Factor (GIF)
- Universal Impact Factor (UIF)
- International Impact Factor Services (IIFS)
- Indian Citation Index (ICI)
- Dictionary of Research Journal Index (DRJI)

**For Details Visit To :** www.researchjourney.net

SWATIDHAN PUBLICATIONS

| | | |
|---|---|---|
| 20 | Study of Impact of Buyback on Earning Per Share of the Company<br>Nitin Prakash Jain, Dr. Dilip Rambhau Jagtap | 059 |
| 21 | Green Marketing in India - An Overview<br>Prof. Ravindra Laxminarayan Totale | 061 |
| २२ | मेक इन इंडिया : उत्पादन के क्षेत्र में संभावनाएँ एवं चुनौतियाँ<br>डॉ. सचिन दुबे | ०६४ |
| २३ | वैश्विक स्तर पर हिंदी कास्थान एवं भूमिका<br>प्रा.डॉ. राजेंद्र बाविस्कर | ०६६ |
| २४ | स्वच्छ भारत अभियान इन्दौर बना परिवर्ततन का पर्याय बदलाव प्रबंधन की एक उन्नति मिशल<br>श्वेता जोशी, डॉ. अशोक वर्मा | ०६९ |
| २५ | वैश्वीकरण और हिंदी<br>डॉ. गोकुलदास सोनु ठाकरे | ०७१ |
| २६ | निश्चलनीकरण : वास्तव आणि परिणाम<br>प्रा.डॉ. अरुण उखा पाटील | ०७३ |
| २७ | कोकणा – कोकणी समाजाचा कौटुंबिक व वैवाहिक जीवनाचा इतिहास<br>प्रा. डॉ. डी.डी. राठोड | ०७५ |
| २८ | नंदुरबार जिल्ह्यातील ग्राहकांच्या वर्तणूकीवर परिणाम करणाऱ्या विपणनातील आधुनिक प्रणालींचे (E-Commerce) अध्ययन<br>प्रा. गावित दिपक दामू, प्रा. डॉ. डी. आर. जगताप | ०७७ |
| २९ | ई–कॉमर्स : एक दृष्टीक्षेप<br>प्रा.डॉ. टी.ए. मोरे | ०७९ |
| ३० | प्रत्यक्ष कृषी विपणनातील (शेतकरी – बाजारपेठ) ऊझावर संथाईची भूमिका व मूल्यमापन<br>प्रा.डॉ. के.बी. गिरासे | ०८२ |
| ३१ | ख्रिस्ती धर्माचा प्रसारात व्यापारी मार्गाची भूमिका : एक चिकित्सक अभ्यास<br>वळवी विश्वास गोरखनाथ | ०८४ |
| ३२ | वस्तू व सेवा कराच्या माध्यमातून सामाजिक जबाबदारी संदर्भातील प्रभावी परिणाम / निष्पत्ती<br>प्रा. डॉ.पी. के. पाटील | ०८६ |
| ३३ | ग्राहक संरक्षण कायदा, १९८६<br>प्रोफेसर एम. एम. मून | ०८८ |
| ३४ | भारतीय वित्तीय व्यवस्थेत नवीन सुरुवात जी.एस.टी.<br>प्रा. दिपक भगवान वरसाळे, प्रा. डॉ. डी. आर. जगताप | ०९१ |
| ३५ | भारतीय अर्थव्यवस्थेत जी.एस.टी. ची वाटचाल आणि परिणाम<br>प्रा.डॉ. वायसे शामराव भगवान | ०९३ |
| ३६ | नोटबंदी एक ऐतिहासिक निर्णय<br>प्रा. कांतिलाल डी. सोनवणे | ०९६ |
| ३७ | विपणन व्यवस्थापन<br>प्रा. नाईक पी. एन. | १०० |
| ३८ | भारतातील विमुद्रीकरण : वास्तव, आव्हाने व परिणामांचे चिकित्सक अध्ययन<br>डॉ. डी. आर. जगताप, डॉ. बापु बाबुराव मंगळे | १०२ |
| ३९ | बँकामधील नव–तंत्रज्ञान : ई–बँकींग<br>प्रा. डॉ. अविनाश रामलाल निकम | १०४ |
| ४० | नोटबंदीचे परिणाम<br>डॉ. ताराचंद माधव सावसाकडे | १०७ |

'RESEARCH JOURNEY' *International Multidisciplinary E- Research Journal*
Impact Factor - (SJIF) – 6.261
Special Issue 146 B : RECENT TRENDS IN SOCIAL SCIENCES
ISSN : 2348-7143
Feb. 2019

# विपणन व्यवस्थापन

प्रा. नाईक पी. एन.
कला व वाणिज्य महाविद्यालय, अक्कलकुवा, जि. नंदुरबार

**प्रस्तावना**

विपणन हा शब्द विपणन असा बनलेला आहे. पणन या शब्दाला वि हा धातू जोडलेला आहे. मुळ शब्द पणि पणि म्हणजे व्याजाचा धंदा करणारे लोक असा उल्लेख ऋग्वेदात आढळतो. विपणन हा संज्ञा विपणी या शब्दापेक्षा फारच व्यापक आहे. विपणन मध्ये उत्पादकांनी उत्पादित केलेल्या वस्तु त्याची किंमत ठरवुन उपभोक्त्याच्या हातात पडेपर्यंत कराव्या लागणाऱ्या सर्व प्रक्रियांचा समावेश होतो. विपणन अथवा मालाचा उठाव करण्याचा मुख्य हेतु म्हणजे ग्राहक. ज्या ठिकाणी असतोच त्यांना ज्या वस्तु हव्या असतोच त्या वस्तु त्या ठिकाणी पोहचविणे विपणनाची व्याप्ती व विपणनात केल्या जाणऱ्या क्रिया या वरुन विपणन या शब्दाबाबत वेगवेगळ्या तज्ञानी वेगवेगळ्या पध्दतीने अर्थ सांगितले आहे. जसे की ग्राहकांच्या दृष्टीने खरेदी म्हणजे विपणन तर विक्रेत्याच्या दृष्टीने विक्री म्हणजे विपणन. जाहिरातदाराच्या दृष्टीने जाहिरात म्हणजे विपणन इ. पध्दतीने विपणन या संज्ञेचा अर्थ वेगवेगळ्या पध्दतीने लावला जातो. इंग्रजीत Marketing हा शब्द Market चे रुप असुन जुन्या फ्रेंच मधील Markeit, इटालियन Merecato, जर्मन ही Markt रुपे लॅटन शब्द Mercatus यावरुन आलेले आहेत.

विपणन म्हणजे मालाची विक्री करणे ही विपणन शब्दाची सुरुवातीची व्याख्या

१) अमेरिकन मार्केटींग ॲसोसिएशनच्या मते, उत्पादकाकडुन उपभोक्ता पर्यंत वस्तुंचा प्रवाह संचलित करणारी व्यावसायीक कार्ये म्हणजे विपणन होय.

२) फिलीप कोंटलर यांच्या मते, विपणन ही अशी मानवी क्रिया की, ज्यात विनिमय प्रक्रियांच्या माध्यमातुन गरजा व आवश्यकतांची पुर्तता केली जाते.

३) विपणनाची आधुनिक व्याख्या, ग्राहकांच्या गरजांचा शोध घेवुन वस्तु आणि सेवांची निर्मिती करणे, वस्तु वाटपात घाऊक व किरकोळ व्यापाऱ्यांचे सक्रीय सहकार्य घेऊन ग्राहकांची मागणी पूर्ण करणे व तीव्र स्पर्धेच्या काळातही मागणी ठेवणे म्हणजेच विपणन होय.१

व्यवस्थापनाचा अगम हा मानवी प्रथमत: उगमा बरोबर झालेला आहे. आदिम काळात प्रथमत: निर्माण झालेल्या व्यक्ति समुहामध्ये जेव्हा समुहाचे हित साध्य करण्यासाठी काही व्यक्ती पुढे आले तेव्हा पासुन व्यवस्थापनाची गरज भासु लागली. म्हणूनच असे समजले जाते की, व्यवस्थापनाची प्रक्रिया ही मानवी प्रयत्नांशी निगडीत आहे. पण खऱ्या अर्थाने व्यवस्थापनाची सुरुवात ही २० व्या शतकापासुन मानली जाते. व्यापक अर्थाने व्यवस्थापनाची कार्ये म्हणजे व्यवस्थापनात होय. असे म्हणता येते. व्यवस्थापन म्हणजे लोकांकडुन काम करवुन घेणे असे मानले जाते. पण त्याच बरोबर व्यवस्थापन म्हणजे एक प्रकारची सामित्रिक प्रक्रिया आहे.

१) पिटर ड्रकर यांच्या मते, व्यवसाय व्यवस्थापक, कामगार आणि त्यांच्या कार्याची व्यवस्था करण्याचे व्यवस्थापन हे विविधपयोगी साधन आहे.

२) हॅन्री फेयॉल यांच्या मते, व्यवस्थापन म्हणजे भविष्याबद्दल अंदाज बांधणे, नियोजन करणे, संघटन उभारणे, आदेश देणे, समन्वयक साधणे आणि नियंत्रण ठेवणे होय.

३) मेरी नाईलसच्या मते उपलब्ध साधनांच्या साहाय्याने व्यवसायाची सामान्य उद्दिष्ये साध्य करण्याचे कार्य म्हणजे व्यवस्थापन होय.२

**विपणनाचे व्यवस्थापन महत्व**

**१) उत्पादकांच्या दृष्टीने विपणनाचे महत्व**

कोणत्याही उत्पादकांचा किंवा कारखानदारांचा किंवा उत्पादन संस्थेचा मुख्य हेतु म्हणजे बाजारपेठेत जास्तीत जास्त वस्तुंची विक्री करुन नफा मिळविणे होय. हे विपणन कार्यामुळे शक्य होते. विपणनाच्या वितरण व्यवस्थेमुळे उत्पादकाला आपला माल ग्राहकांना पाहिजे त्या वेळी पाहिजे त्या ठिकाणी पाठवता येतो. त्याच बरोबर विपणन संशोधनामुळे ग्राहकांच्या गरजांचा व आवडी निवडीचा विचार करुन वस्तुचे उत्पादन करता येते. विपणनामुळे उत्पादकांना योग्य दर्जाचा माल योग्य वेळी पुरविता येतो. त्यामुळे मालाची नासाडी होत नाही व कमी खर्चात मालाचे उत्पादन करता येते. विपणनामुळे उत्पादकांच्या नफ्यात वाढ होत असते.

**२) उपभोक्त्यांच्या दृष्टीने विपणनाचे महत्व**

- विपणन कार्यामुळे उपभोक्त्यांना चांगल्या दर्जाच्या वस्तु योग्य किंमतीत मिळतात.
- विपणनामुळे बाजार पेठेतील अनावश्यक खर्च कमी करता येतो.
- उपभोक्त्यांना नवनविन वस्तुची माहिती मिळते.
- विपणनामुळे उपभोक्त्यांना हव्या त्या वस्तु मिळाल्याने समाधान मिळते.
- विपणामुळे बाजारपेठेत असंख्य वस्तु उपलब्ध होतात. त्यामुळे ग्राहकांना वस्तु निवडीची संध्या प्राप्त होते.

**३) व्यापारी मध्यस्थांच्या दृष्टीने विपणनाचे महत्व**

आधुनिक बाजारपेठेत उत्पादक आणि ग्राहक हे विखुरलेले असल्याने मध्यस्थ हे एकमेकांना जोडण्याचे कार्य करते. आजच्या बाजारपेठेत उत्पादनापेक्षा उपभोक्त्यांना महत्त्वाचे स्थान आहे. असे उपभोक्ते बाजारपेठेत असंख्य ठिकाणी विखुरलेले असतात. तेव्हा असंख्य ग्राहकांच्या गरजा, आवडी-निवडी, हया मध्यस्थामार्फत उत्पादन समजतात. उत्पादकांनी तयार केलेल्या नविन वस्तुची माहिती ही मध्यस्थांमार्फत ग्राहकांना मिळते.

**४) देशाच्या आर्थीक दृष्टीने विपणनाचे महत्व**

भारतासारख्या विकसनशील देशात विपणनाचे महत्व जास्त आहे.

- विपणत व्यवस्थेमुळे विकासनशील देशाला आर्थिक प्रगती करता येते.

- विपणनाच्या सुविधांमुळे देशात दळणवळण व वाहतुकीचा सोयी उपलब्ध होतात.
- विपणन प्रक्रियेमुळे समाजातील क्रयशक्ती एका दिशेने प्रवाहीत करता येते.
- विपणन व्यवस्थेमुळे उत्पादित वस्तुंचे ग्राहक संख्या वाढविता येते.
- विपणन व्यवस्थेमुळे विस्तार व विकास झाल्यामुळे रोजगाराच्या संधी उपलब्ध होतात.
- विपणन कार्यामुळे शेती व औद्योगिक क्षेत्राचा जलद गतीने विकास करण्यास मदत होते. ३

**विपणन व्यवस्थापन कार्ये**

प्रवासाला सुरुवात करण्यापूर्वी सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे आपल्याला कोठे जायचे ते ठरवणे. एखादया व्यावसायिक संस्थेला देखील हेच करावे लागते. सर्वात पहिली पायरी म्हणजे गाठता येण्याजोगी आणि व्यावहारिक उद्दिष्ये हे ध्येय ठरविणे. उद्दिष्ये कशी ठरविली जातात ? प्रो. कुंडिक आणि स्टिल यांनी ध्येये ठरवतांना ती गाठताना काही मुलतत्त्वे विचारात घ्यावी लागतात. याबाबत प्रतिपादन केले आहे. या मुलतत्त्वांचा विचार करुनच विपणनाची कार्ये आधारित आहे.

१) **ध्येय निश्चिती –** विपणन व्यवस्थापनाचे हे एक अत्यंत निर्णायक असे कार्य आहे. याबाबत थोडीशी ही चुक झालीं तर ध्येय गाठण्याचे पुढील सर्व प्रयत्न निरर्थक ठरण्याची भिती असते. कारण ध्येय किंवा उद्दिष्ये ही चुकीची किंवा काल्पनिक असल्याने ती ध्येय या सदरात बसत नाही. म्हणून ध्येय ही सुस्पस्ट आणि कोणत्याही अधिक विश्लेषणाची गरज न लागणारी असली पाहिजे.

२) **सुसुत्री करण –** सुसुत्रता ही चांगल्या व्यवस्थापनाची किल्ली असते. योजनेची सहजतेने अंमलबजावणी होण्यासाठी विविध विभागामध्ये तसेच विभागांतर्गत विविध खात्यांमध्ये सुसंवाद आणि परस्पर संपर्क अनिवार्य असते. त्या मुळे प्रत्येकाने सुसुत्री करणाच्या कार्याचा हातभार लावला पाहिजे.

३) **नियोजन –** ध्येय सुस्पष्ट झाल्यावर तेथपर्यंत कसे पोहचायचे हा प्रश्न येतो. त्यासाठी कोणता मार्ग उत्तम आहे याचा विचार करुन नियोजन करावे लागते आणि निर्धारित उद्दिष्टांपर्यंत जाता येते आणि उद्दिष्टे ही लवचिक असली पाहिजे. जेणे करुन उद्दिष्टांपर्यंत सहज पोहचता येईल.

४) **कर्मचारी निवड –** कर्मचारी निवड ही अनेक संस्थेतील एक डोके दुःखी प्रक्रिया आहे. व्यावसायिक उद्दिष्टये पुर्ण करणे हे एकटया व्यवस्थापकाचे काम नाही तर ते अधिकारी आणि कर्मचारी यांचे सुयुक्त आहे. त्यासाठी प्रशिक्षित आणि योग्य अशा व्यक्तीची नियुक्ती करणे आवश्यक आहे. कर्मचाऱ्यांच्या नियुक्तीचा प्रश्न संघटनेच्या कार्याशी निगडीत आहे. आधुनिक युगात कर्मचारी निवडीचे महत्व लक्षात घेता कर्मचाऱ्यांची निवड हे व्यवस्थापनाचे महत्वाचे कार्य आहे.

५) **विश्लेषण आणि मुल्यमापन –** या कार्यात आखलेले नियोजन आणि कार्यपुर्ती यांचे सुस्पष्ट चित्र प्राप्त होते. आपण कोणत्या चुका केल्या? आपण केलेल्या चुका कशा दुरुस्त होवु शकल्या असल्या ? कोणत्या पध्दती अथवा कल्पना आपल्याला फायदेशिर ठरतिल या कार्यात कोणत्या माहिती तंत्रज्ञान पध्दती वापरुन आपल्याला चांगले परिणाम मिळतात ? विपणन अंदाजपत्रक, विक्री, नविन बाजारपेठ किंवा ग्राहक संबंध, ग्राहक आवडी निवडी इ. क्षेत्रात विश्लेषण मुल्यमापन कार्य प्रभावी होण्यासाठी संगणक प्रणाली सहाय्यभुत ठरते. ४

**संदर्भ**

१) विपणन व्यवस्थापन – डॉ. श्री. वि. कडवेकर
२) व्यवसायिक व्यवस्थापन – डॉ. जे. बी. मोरे
३) वाणिज्य कोश-३ – प्रा. डॉ. संजय कप्तान
४) विपणन व्यवस्थापन व तंत्रे – प्रा. डॉ. छाया सुखदाणे